मुलांसाठी बाइबल
प्रस्तुत

# महान शिक्षक येशू



लेखक: Edward Hughes

रेखाचित्रकार: Byron Unger; Lazarus

रूपान्तरकार: E. Frischbutter; Sarah S.

अनुवादक: Rev. Shilas Gavit

निर्माता: Bible for Children
www.M1914.org

©2017 Bible for Children, Inc.
परवाना (लाइसेंस): तुम्ही जोपर्यंत ही गोष्ट विकत नाहीत, तोपर्यंत तुम्ही तीं कॉपी किंवा मुद्रित करू शकता.



येशू एक महान शिक्षक होता – आत्तापर्यंत होऊन गेलेल्यांत उत्कृष्ट शिक्षक. लोकांचे जमाव त्याचे ऐकत असे. तुम्ही दयाळू, कृपाळू आणि चांगले असा.



इतर कदाचित
त्यांचा तिरस्कार
करतील व दुःखवतील, परंतू परमेश्वर
त्यांची काळजी वाहील, अशी
शिकवण येशूने दिली.



येशूने पुष्कळ गोष्टी शिकवल्या. तो म्हणाला, जसे दिवा घरात प्रकाश देतो तसे देवाच्या लोकांनी जगाला प्रकाश द्यावा. एका अंधाऱ्या खोलीत एक दिवा किती फरक पाडू शकतो!

ज्या लोकांशी येशू बोलला, ते सूड उगवण्यात विश्वास करत होते, "डोळ्या बद्दल डोळा, दाता बद्दल दात."
जरी शत्रू असेल तरी
देखिल दयाळूपणा,
क्षमाशिलपणा
आणि प्रीति,
करावी असे
येशूने
शिकविले.




येशूच्या दिवसांत, काही लोक खूप
पवित्र आहोत असे दाखविण्याचा
प्रयत्न करित होते. जेंव्हा ते एखाद्या
भिकाऱ्याला पैसा देणार असतील तेंव्हा
त्यांच्या बरोबर असणारा ...


... मनुष्य मोठ्याने तुतारीचा
आवाज करित असे म्हणजे सर्व
लोक त्यांच्याकडे पाहतील तेंव्हा ते
भिकाऱ्याला पैसा देत. "तुमचे दानधर्म
गुप्तपणे करा, आणि देव
तुम्हांला
त्याचे
प्रतिफळ
देईल,"
असे येशू म्हणाला.

प्रार्थनेविषयी देखिल येशूने असेच शिकविले. काही लोक बाजारपेठांत उंच चव्हाठ्यावर उभे राहून प्रार्थना करित असत जेणेकरुन सर्व लोकांनी त्यांना पाहावे व ऐकावे अशी त्यांची इच्छा असे.



त्यांना देवाविषयी काही काळजी नव्हती. तर इतर लोक त्यांच्याविषयी काय विचार करतील याची त्यांना काळजी वाटत असे. येशूने त्यांना "ढोंगी" आहे असे म्हटले.



त्याचे शिक्षण समजवून सांगण्यासाठी येशूने पुष्कळ वेळा निसर्गाचा वापर केला. उदाहरणार्थ, त्याने पक्षांकडे दाखवित म्हटले, "तुमचा स्वर्गिय पिता त्यांना त्यांचे अन्न पुरवितो."



"तुम्ही काळजी करु नका, देव तुम्हांला देखिल तुमचे अन्न पुरवून देईल."



येशू पुढे म्हणाला, "श्रीमंत राजा शलमोन देखिल जेवढा सजला नाही त्यापेक्षा अधिक चांगला पोषाख परमेश्वर रानातील फुलांना देतो. रानातील फुलांना जर परमेश्वर ऐवढा
चांगला
...



... पोषाख घालत असेल तर तुम्हांला पोषाख घालणार नाही काय?" जो देव आमच्या सर्व गरजा भागवितो त्याच्यावर आम्ही अवलंबून असावे असे येशू लोकांना शिकवित होता.



"जर तुम्ही आपल्या भावाचा न्याय करता, याचा अर्थ तुमच्या डोळ्यात असलेला मोठा कचरा न पाहता तुमच्या भावाच्या डोळ्यात असलेला बारीक कचरा तुम्ही पाहता, असा होतो." असे येशू म्हणाला. लोक कदाचित गालातल्या गालात हसले असतील. परंतू त्यांना याच्या अर्थाविषयी विचार करणे आवश्यक होते.





मदतीसाठी लोकांनी देवाकडे जावे
असे येशूने सांगितले. उपाशी मुलाने भाकर
मागितली असता दगड देईल असे जगातील
पिता करतात का? नाही! जे चांगले तेच ते
देतात. जे कोणी
मागतात त्यांना देव
देखिल चांगल्या
गोष्टी देतो.

महान शिक्षक येशू, याने; खोट्या शिक्षकांच्या बाबतीत सावधगिरी बाळगण्यास सांगितले. "मेंढरांसारखे दिसावे म्हणून ते मेंढरांसारखा पेहराव करतात, परंतू आंतून ते लांडगे असतात!" असे येशूने शिकविले. तो म्हणाला, खोटे शिक्षक त्यांच्या जगण्यातून आणि राहणीमानातून ओळखता येतील.




त्याने सांगितलेल्या गोष्टीत येशूने असे दाखवले की, जे
लोक देवाच्या वचनाप्रमाणे जीवन जगतात ते खडकावर
बांधलेल्या घरासारखे आहेत.
भयंकर वादळ–वारा
त्याच्यावर आदळेल तरी
ते घर पडणार
नाही; ते मजबुत
असे उभे राहिल.

परंतू मुर्ख मनुष्य त्याचे घर वाळूवर बांधितो. जेंव्हा वादळ त्याच्यावर येईल तेंव्हा ते अगदी कोसळून पडेल कारण त्याचा पाया मजबुत नव्हता. येशूने म्हटले की, जे लोक देवाच्या वचनाप्रमाणे जीवन जगत नाही ते लोक यापप्रकारचे असतात.



येशूची शिकवण ऐकून लोक अचंबित झाले होते. याप्रकारच्या गोष्टी त्यांनी याच्याआधि कधिही ऐकल्या नव्हत्या.



आता केवळ देवाचे वचन ऐकणे ऐवढे पुरेसे नाही हे त्यांना कळले होते. आता प्रत्येक दिवशी त्यांना देवाच्या वचनाचे पालन करणे आवश्यक होते.



महान शिक्षक येशू

परमेश्वराची वाणी - बाइबल मधून गोष्ट

घेण्यात आली आहे

मत्तय ५–७, लूक ६

"तुझ्या वचनांच्या उलगड्याने प्रकाश प्राप्त होतो."
स्तोत्रसंहिता ११९:१३०


समाप्त

बाइबलमधील ही गोष्ट आम्हांला आमच्या सुंदर ईश्वराविषयी सांगते ज्याने आम्हांला बनविले आणि ज्याची इच्छा अशी आहे की आम्ही त्याला ओळखावे.

ईश्वराला माहित आहे की आम्ही वाईट गोष्टी केल्या आहेत, ज्याला तो पाप म्हणतो. पापाची शिक्षा मृत्यू आहे, पण ईश्वर तुमच्यावर इतके प्रेम करतो की त्याने तुमच्या पापांसाठी शिक्षा मिळावी आणि क्रॉसवर मरण यावे म्हणून त्याच्या एकुलत्या पुत्राला येशूला पाठविले. नंतर येशू पुन्हा जिवंत झाला आणि स्वर्गातल्या घरी गेला. जर तुम्ही येशूमध्ये विश्वास ठेवता आणि तुमच्या पापांसाठी त्याने क्षमा करावी अशी त्याला विनंती करता, तर तो नक्की क्षमा करील. तो आता तुमच्याबरोबर येऊन राहील आणि तुम्ही त्याच्याबरोबर कायम राहणार.

जर हे सत्य आहे यावर तुम्ही
विश्वास ठेवता, तर ईश्वराला हे सांगा:

प्रिय येशू, तू ईश्वर आहेस आणि माझ्या पापांसाठी मृत्यू भोगण्यास मनुष्य बनलास आणि आता तू पुन्हा जगतोस यावर माझा विश्वास आहे. कृपा करून माझ्या जीवनात ये आणि माझ्या पापांसाठी मला क्षमा कर, जेणेकरून आता मला नवीन जीवन प्राप्त होईल, आणि एक दिवस मी कायम तुझ्याबरोबर राहण्यासाठी निघेन. तुझी आज्ञा पाळण्यासाठी आणि तुझे मूल होऊन जगण्यासाठी मला मदत कर. आमेन.

बाइबल वाचा आणि ईश्वराशी रोज बोला!

जॉन 3:16